१०/१/२३

# उर्फीला पोलीस संरक्षण द्या : रूपाली चाकणकरांचे आदेश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मॉडेल उर्फी जावेद हिच्यावर हल्ला होऊ शकतो. त्यामुळे तिला संरक्षण देण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी मंगळवारी मुंबई पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

ऊर्फी जावेद व भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्यात सध्या वाद पेटला आहे. त्यावरून उर्फी जावेदने राज्य महिला आयोगाकडे चित्रा वाघ यांच्या विरोधात तक्रार दाखल केली असून पोलीस संरक्षणाची मागणी केली आहे.

चित्रा वाघ या राजकीय व्यक्तित्व असल्याने त्या किंवा त्यांचा प्रभाव असलेली व्यक्ती अथवा समूहाकडून उर्फी जावेद यांच्यावर हल्ला होऊ शकतो. त्यामुळे उर्फी जावेदच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे उर्फीला त्वरित संरक्षण द्यावे व त्याचा अहवाल सादर करा, असे निर्देश महिला आयोगाने दिले आहेत.

# उर्फी जावेदला पोलिस संरक्षण द्या

## रूपाली चाकणकर यांचे पोलिसांना पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उर्फी जावेदने महिला आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीची आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात आली आहे. आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी मुंबई पोलिस आयुक्तांना पत्र लिहून उर्फीला पोलिस संरक्षण पुरविण्यात यावे, असे आदेश दिले आहेत.

महिला आयोगाने पोलिस आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात चित्रा वाघ या राजकीय व्यक्ती असल्याने त्या किंवा त्यांचा प्रभाव असलेली व्यक्ती अथवा समूहाकडून उर्फी यांच्यावर हल्ला होऊ शकतो. त्यामुळे उर्फी यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. वाघ यांच्या धमकीमुळे उर्फीला घराबाहेर पडताना भीती वाटते. त्यांना मुक्तपणे वावरता येत नाही. या प्रकरणाची दाहकता लक्षात घेऊन त्यांना सुरक्षा पुरवण्याची मागणी उर्फीने केल्याचे चाकणकर यांनी पत्रात म्हटले आहे.



### कार्यवाहीचा अहवाल सादर करा

स्वच्छंद आणि मुक्त संचाराचा हक्क राज्य घटनेने प्रत्येक नागरिकाला दिला आहे. पुरोगामी महाराष्ट्राच्या राजधानी मुंबईत एका महिलेला असुरक्षित वाटणे हे गंभीर आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे उर्फीला त्वरित संरक्षण द्यावे व तो अहवाल त्वरित सादर करावा, असे आदेश पत्रात दिले आहेत.